ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

''इ.स. 1857 च्या उठावात महाराष्ट्राचे योगदान–एक संक्षिप्त अध्ययन''

प्रा.डॉ.जगदिश दयासागर हेंडवे
इतिहास विभाग प्रमुख ,
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा.

प्रस्तावना :-

इतिहासाच्या जडणघडणीत समाजातील प्रत्येक घटकाचा वाटा आहे. प्रत्येक स्थरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थल कालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक, प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय व संस्कृतीच्या इतिहासाची वलये आकार घेतात. प्रादेशिक इतिहासाच्या वलयातूनच राष्ट्राचा इतिहास साकार होतो. यातूनच प्रादेशिक इतिहासाला अनन्य साधारण महत्व आहे. म्हणूनच स्वतंत्र भारताचा इतिहास समजून घेण्यासाठी महाराष्ट्राचा प्रादेशिक इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला इतिहासाची भक्कम व प्राचीन परंपरा आहे. महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे.

इतिहासाच्या विस्तीर्ण पटलावर प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुणा महाराष्ट्राच्या मातीचा इतिहास सांगतात. यातीलच इ.स.पूर्व 230 पासून सातवाहनांची 460 वर्षे टिकून असलेली शक्तीशाली सत्ता दक्षिण भारताच्या सुवर्णयुगीन इतिहासाची भक्कमता सांगणारी आहे. तर महाराष्ट्रातील प्रतिष्ठाण (पैठण) या सत्ता केंद्राने सर्वप्रथम महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय पटलावर स्थान निर्माण केले. तर दक्षिण भारतात शिवाजी राजाने स्वराज्य स्थापन केल्यामुळे या महाराष्ट्रात स्वतंत्र अस्तित्व व अस्मिता बहाल केली.

इ.स.1600 साली इग्लंडमध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. इग्लंड सरकारने या कंपनीला जगभर व्यापार करण्याची परवानगी दिली. या कंपनीचे मोगल काळात भारतात व्यापारानिमित्य आगमन झाले. म्हणजेच ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने जहांगिरच्या काळात भारतात प्रवेश केला. येथून या कंपनीने भारताशी 1757 पर्यंत केवळ व्यापार केला. इ.स. 1757 मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा भारतात प्लासीच्या युध्दाने राजकीय सत्तेचा पाया रोवल्या गेला. येथून पुढील एका शतकात कंपनीने संपूर्ण भारतावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. परिणामी भारतीय राजे, जहांगिरदार, वतनदार, जमीनदार, सैन्य, शेतकरी, मजूर, जनमाणसांच्या मनात कंपनी विरूध्द कमालीचा असंतोष निर्माण झाला. त्याचाच परिणाम म्हणजे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरोधात देशात 1857 चा उठाव झाला. या उठावात महाराष्ट्राने महत्वाची भूमिका बजावली.

➢ उठावाचे उद्दिष्टे:–

उठावकर्त्यांसमोर जी उद्दिष्टे होती ती फारसी पुरोगामी नव्हती. त्याचबरोबर काही भारतीय राज्यकर्ते जुनी सरंजामशाही मूल्य टिकविण्यासाठी संघर्ष करीत होते, असेही म्हणता येणार नाही, मात्र 1857 मध्ये भारतात व महाराष्ट्रात संमिश्र स्वरूपाचे वातावरण होते. या काळात राष्ट्रीय भावना निश्चितपणे उदयास आली होती. त्याचे स्वरूप आजच्या सारखे स्पष्ट नव्हते. आजच्या सारखा धारधार राष्ट्रवाद नव्हता. भारतीय समाज, राजे, महाराजांना, नवाब, बादशहांना मानणारा होता.

प्राचीन गणराज्य वगळता लोकशाही मूल्य भारतात उदयास आली नव्हती. स्वराज्य कसे व कोणते असावे याची पुसटशी कल्पनादेखिल समाजमनात निर्माण झाली नव्हती. सातासमुद्रापलीकडून आलेल्या लोकांनी आपल्याला गुलाम केले आहे, आपण स्वातंत्र्य गमावून बसलो आहोत, ते आपल्याला परत मिळवायचे आहे, याच ध्येयापोटी 1857 चा संघर्ष भारतात व महाराष्ट्रात घडून आला.

निधर्मी राष्ट्रवाद आणि लोकशाही मूल्ये जरी त्यात दिसून येत नसली तरी ज्या मूल्यांसाठी बंडवाले सैनिक, राजे रजवाडे व सरदार हे एकत्र आले होते. ती मूल्ये निश्चितपणे स्फुर्तिदायक आणि उदात्त होती. त्या काळातील लोक आपल्या संस्थानिकांचे वा राजांचे अथवा पेशव्यांचे नेतृत्व मानीत होती. तर हिंदू मुस्लिम लोक मोगल बादशाहा बहादूर शहा जफर याने केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देवून एकत्र आले होते. हिंदू मुस्लिमांची अभूतपूर्व एकी हे 1857 च्या उठावाचे महत्वाचे वैशिष्टे होते. परकीय राज्यकर्ते हेच आपले समान शत्रु आहेत, त्यांचे उच्चाटन करणे हे आपले कर्तव्य आहे, हे दोन्ही जमातींना वाटत होते. आज भारतीय राजकारण्यांनी या दोन्ही जमातीत कमालीचा व्देष निर्माण केला आहे. तेवढा व्देष 1857 च्या उठावात दिसून येत नाही.

➢ उठावाची कारणेः–

ब्रिटिशांनी 1757 च्या प्लासीच्या युध्दाने भारतात राजकीय सत्तेचे बिजारोपण केले. तर 1764 च्या बक्सार युध्दाने सत्तेचे दृढीकरण झाले. नंतर हळूहळू त्यांनी व्यापारासोबतच राज्यविस्तार सुरू ठेवला. युध्द व कुटनितीचा वापर करून त्यांनी भारताच्या विस्तीर्ण प्रदेशावर सत्ता व साम्राज्य विस्तार केला. नवीन प्रशासनाव्दारे सत्तेचे दृढीकरण केले. ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता सर्वोच्च घोषीत करून ''कायद्याचे राज्य'' स्थापन केले. त्यांनी भारतीयांचे सर्वप्रकारे शोषण केले. जेव्हा भारतीयांनी या सत्तेच्या शोषणाविरूध्द आवाज उठविला तेव्हा भारतीयांनी त्यासोबत तत्कालीन अन्यायी व शोषक सत्तेचाही विरोध केला. या सत्तेविरोधात संघटीत उठाव झाले. अशा उठावामागे अनेक कारणे होती. त्यात राजनैतिक, प्रशासकीय, धार्मिक, सामाजिक आणि इतर कारणांचा समावेश होता.

1. राजनैतिक व प्रशासकिय कारणे :–

भारतावर इंग्रजांची सत्ता ही युरोपियन सैन्यामार्फत चालणारी होती. लष्करी निरंकुशता, नोकरशाही, प्रशासन पध्दतीचे दोष, भूमीकर वसुली यामुळे असंतोष, धोकेबाजी व अन्यायी, अत्याचारी धोरण वाढले होते. गरिबांच्या जमीनी सावकारांनी लुबाडणे सुरू केले होते. तत्कालीन न्याय व्यवस्थेत शेतकरी, मजूर व गरिबांना न्याय मिळणे दुरापस्त होते.

2. आर्थिक कारण :–

ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील सुती कापड व्यवसाय आपल्या ताब्यात घेतला. यंत्रावरील तयार कापड भारतात आणून त्यांनी जास्तीत जास्त नफा मिळविला. कंपनी भारतातील कच्चा माल अत्यंत कमी किंमतीत खरेदी करीत. भूमीकर, उत्पन्न याविषयी कंपनीचे आर्थिक धोरण पुर्णतः शोषणाच्या तत्वावर आधारित होते. परिणामी कर खुप जास्त आकारले जाई. शेतकरी व जमीनदार दोन्ही कराच्या ओझ्याखाली दबले होते. त्यांना शासनाचा कर देणे शक्य नव्हते. दुष्काळी काळात दिली जाणारी मदत अत्यल्प असून ती पिडितांपर्यंत पोहचत नव्हती. शिवाय आदिवासी क्षेत्रातील धोरण अत्यंत वाईट व अन्यायपूर्ण होते.

3. सामाजिक व धार्मिक कारण :–

या काळात शोषक व शोषितांच्या धर्मकल्पना वेगवेगळ्या होत्या. राज्यकर्त्यांनी भारतीयांची धार्मिक स्थळ नष्ट करणे सुरू केले होते. ख्रिश्चन धर्माचा प्रसार वेगाने केला जात होता. हिंदू व मुस्लिम दोन्ही जमाती धर्मकार्य, अनुष्ठान, अंधश्रध्दा यामध्ये अडकले होते. आपल्या धर्मावर होणाऱ्या हल्ल्यामुळे शोषित प्रजा, आदिवासी सर्वच पेटून उठले होते. इंग्रजी सत्तेला विरोध सुरू झाला. इंग्रज

स्वतःला भारतीयांपेक्षा श्रेष्ठ व वेगळे समजत. त्यामुळे त्यांनी येथील लोकांना आपल्या नोकऱ्या व इतर कामातून बाजूला ठेवले होते. तेथील सामाजिक परंपरा, धर्मश्रध्दा, मुर्तीपूजा या बाबींवर त्यांनी कठोर प्रहार केलेत. परिणामी भारतीयांच्या मनात कमालीचा असंतोष निर्माण होवून उठावाची भूमिका निर्माण होण्यास तयार झाली. हे उठाव आदिवासी, शेतकरी व कामगारांनी केले होते. तसेच ते लष्करी, नागरी व राजकीयही होते, शिवाय इतर अनेक कारणेही या उठावास कारणीभूत ठरली आहेत.

➢ कोल्हापूर संस्थानातील उठाव :–

कोल्हापूर हे शहर व संस्थान राष्ट्रीय कार्यात नेहमीच आघाडीवर राहीले आहे. उत्तर भारतात 1857 मध्ये जे स्वातंत्र्ययुध्द झाले, त्याचे पडसाद ह्या प्रदेशावरही उमटले होते. या काळात कोल्हापूर संस्थानाने दोन वेळा उठाव केला होता. पहिला उठाव 31 जुलै 1857 मध्ये केला, तर दुसरा प्रयत्न याच वर्षी डिसेंबरमध्ये करण्यात आला. दुर्दैवाने दोन्ही उठाव यशस्वी झाले नाहीत. पण या उठावाची तीव्रता प्रखर होती.

पहिल्या उठावात कोल्हापूरातील 27व्या रेजिमेंटमधील दोनशे सैनिकांनी भाग घेतला. देशभक्तीने पेटलेल्या या सैनिकांनी रेजिमेंटच्या तिजोरीचा ताबा घेतला, तसेच छावणीत प्रदेशातील दुकानावरही ते चालून गेले. कोल्हापूरच्या सैनिकांनी 27व्या रेजिमेंटचे बंड मोडून काढण्याचा प्रयत्न केला. संस्थानच्या ब्रिटिश धार्जीण्या सैन्याने रेजिमेंटच्या सैनिकांवर प्रतिहल्ला केला. युरोपियन अधिकाऱ्यांच्या बायका मुलांचे संरक्षण केले. बंडखोर सैनिकांचे पारिपत्य करण्यासाठी इंग्रजांनी इतर ठिकाणावरून लष्करी कुमक पाठविली. तेव्हा देशभक्त बंडखोर सैनिकांना पळून जावे लागले. जेकब या इंग्रजी अधिकाऱ्याने हा उठाव दडपून टाकण्यात महत्वाची भूमिका बजावली. कोल्हापूरातील हा उठाव स्वयंपूर्ण होता, त्यात जनतेचा सहभाग होता. या संस्थानातील लोक ब्रिटिशांच्या राजवटीवर नाराज होते. हेच या उठावाचे यश होते.

1857 च्या डिसेंबरमधील दुसऱ्या उठावात चिमासाहेब अग्रभागी होते. चिमासाहेब कोल्हापूरच्या राजाचे बंधू होते. चिमासाहेबांचा ग्वाल्हेरच्या नेत्यांशी दृढ संबंध होता. उत्तरेतील उठावाला कोल्हापूर परिसरातील लोक प्रतिसाद देतील असे आश्वासन चिमासाहेबांनी दिले होते. पुणे, बेळगांव व धारवाड येथूनही आपल्याला प्रतिसाद मिळेल असे बंडवाल्यांना वाटत होते. पण या दुसऱ्या उठावाला यश मिळू शकले नाही.

कोल्हापूरच्या प्रकरणाचे निष्कर्ष तसे उत्तर भारतातील उठावापेक्षा वेगळे होते. कोल्हापूर परिसरात साम्राजाच्या गादीची जी विल्हेवाट लावली होती, कुटील कारवाया करून त्यांनी जे सरकार सत्तेवर आणले, याची चिड मराठी जनमाणसात निर्माण झाली होती. त्यामुळे जनतेतील असंतोष वाढत गेला. अर्थात या उठावाची कारणे राजकीय होती. तर उत्तरेतील बंड धार्मिक, अंधःश्रध्देतून उद्‌भवले होते.

➢ नरगुंदचा उठाव :–

नरगुंद हे धारवाड जिल्ह्यातील छोटे गांव होते. नरगुंदच्या भाव्यांना इंग्रजांनी 1843 साली दत्तक घेण्यास परवानगी नाकारली होती. त्यामुळे भावे चिडले होते. 1857 च्या उठावावेळी संस्थानिक भास्करराव भावे ह्यांनी निःशस्त्र व्हावे असा आदेश इंग्रजांनी काढला आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगातूनच मे 1858 मध्ये बंड उद्‌भवले.

यावेळी ॲक्टींग पॉलीटिकल एजंट मैनसन अवघे 12 सैनिक घेवून भाव्यांवर तुटून पडला. यावेळी भाव्यांनी मैनसनला ठार केले आणि त्याचे शिर नरगुंदला मिरवत आणले. परिणामी 1 जून 1858 ला इंग्रजांनी प्रचंड सैन्यासह नरगुंदवर आक्रमण केले. तेव्हा भाव्यांनी वारकऱ्यांच्या वेशात पलायन केले. मात्र पुढे त्यांना इंग्रजांनी पकडून फासावर चढविले होते. या उठावात भाव्यांचा पराभव झाला असला तरी त्यांनी इंग्रजांचा तीव्र प्रतिकार केला. हे या उठावाचे यशच होते.

➢ जमखिंडीचा उठाव :–

1857 चे वातावरण राजकीय परिवर्तनाच्या कल्पनेने भारावले होते. काहीतरी अवचीत घडणार व देशाला स्वराज्य मिळणार असा अनेकांना विश्वास होता. यावेळी जमखिंडीच्या राजांनी बरीच शस्त्रे जमविली होती. जनू त्यांना 1857 च्या उठावाची कल्पनाच होती. जमखिंडीचे आप्पासाहेब व इंग्रज सरकार यांचे संबंध चांगले होते. तरीपण जमखिंडीच्या राजांनी शस्त्रे का जमविली हे रेजिमेंटच्या लक्षात येईना.

तेव्हा इंग्रजाना आप्पासाहेब यांच्याविषयी संशय आला. तेव्हा त्यांनी मुंबईच्या इंग्रज गव्हर्नरला ही सर्व माहिती कळविली. जमखिंडीतील ही सर्व तयारी पाहून इंग्रज गप्प बसणारे नव्हते. तेव्हा इंग्रजांनी धरपकडीचा आदेश दिला. अनेकांना पकडून त्यांची तुरूंगात रवानगी केली. संस्थानात राजाला अजूनही मान होता. आपल्या राजावर संकट येवू नये म्हणून छोटूसिंग नावाच्या देशभक्ताने शस्त्रास्त्रे जमविण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. तेव्हा इंग्रजांनी छोटूसिंगला पकडून सरळ तोफेच्या तोंडी दिले. यावेळी संस्थानातील प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. या घटनेमुळे इंग्रजांनी जनतेत दहशत निर्माण केली. अशा प्रकारच्या शिक्षा 1857 मध्ये सर्वत्र देण्यात आल्या.

जमखिंडीच्या राजेसाहेबांना इंग्रजांनी अटक केली. काही दिवस त्यांना बेळगांव येथे तर पुढे वेंगुर्ल्याला ठेवले होते. 1858 च्या राणीच्या जाहिरनाम्यानुसार राजेसाहेबांची सुटका करण्यात येवून त्यांना त्यांची गादी परत करण्यात आली. असे जरी असले तरी येथील राजे व जनतेच्या मनात इंग्रजाविषयीची चीड कमी झाली नाही, हे विशेष होते.

➢ भिल्ल आणि कोळी लोकांचे उठाव :–

कोळी व भिल्लांनी इंग्रजी सत्तेविरूध्द खानदेश, नाशिक व अहमदनगर परिसरात दिलेल्या झुंजी रोमहर्षक आहेत. नाशिक जिल्ह्यातील पेठ व सुरगाणा हा भाग दुर्गम होता. या परिसरात कोळी लोकांनी उठाव केले. या उठावाला पेठचा राजा भगवंतराव निळकंठराव यांनी सक्रिय उत्तेजन दिले होते. शिवाय त्यांनी उठावाचे नेतृत्वही केले. या उठावात कोळ्यांनी बाजारपेठा, सरकारी कार्यालये प्रमुख लक्ष केले होते. कोळ्यांची संख्या प्रचंड होती. याशिवाय भिल्ल कोळ्यांना येवून मिळाले. भिल्लांचा नेता भागोजी नाईक होता. अशाप्रकारे भिल्ल आणि कोळी एकत्र आल्याने ताकद आणखी वाढली. जंगलाचा आश्रय घेवून त्यांनी इंग्रजांचा तिव्र प्रतिकार केला. पण शेवटी कोळी व भिल्लांना इंग्रजासमोर हार मानावी लागली.

जंगलात लपून बसलेल्या कोळी व भिल्लांना पकडण्यात आले. बंडाचे नेतृत्व करणाऱ्या भगवंतरावांना फाशी देण्यात आली. भिल्लांचा नेता भागोजी नाईक पळून जाण्यात यशस्वी झाला, मात्र त्याची आई इंग्रजांच्या हाती लागली. भिल्लांच्या अनेक स्त्रिया इंग्रजांनी पकडल्या. महाराष्ट्रात या उठावाला अनेक राजघराणे हस्ते, परहस्ते मदत करीत होती. इंग्रजांना याची पूर्ण कल्पना होती, पण पुराव्याअभावी ते दूर्लक्ष करीत होते.

पुन्हा नोव्हेंबर 1857 मध्ये उठावाला प्रारंभ झाला. या उठावाचे नेतृत्व काजीसिंग, भिमा, मोवाशिया नाईक यांनी केले. भिल्लांनी सरकारी खजिने लुटून पैसा जमविला होता. निजामी प्रदेशातून त्यांनी रजाकार रोहीले व पठाण या टोळ्यांचीही मदत घेतली. दगड, गोटे व शीळा ही भिल्लांची पारंपारिक हत्यारे होती, तोफा व बंदुकापेक्षा जास्त परिणामकारक होती. 11 एप्रील 1857 मध्ये भिल्ल व इंग्रज सैन्यात प्रचंड लढाई झाली. ही लढाई अंबापाणीची लढाई म्हणून प्रसिध्द आहे. या लढाईत भिल्लाचे 56 लोक मारले गेले तर 170 लोक जखमी झाले. 62 भिल्लांना कैदी बनविले, त्यातील 57 भिल्लांना ठार करण्यात आले. इंग्रजांनी 1857 मध्ये सर्वत्र सुडयंत्र आरंभिले होते. अत्यंत कठोरपणे इंग्रजांनी हा उठाव दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.

असे असले तरी नाशिक जिल्ह्यातील नांदगांव येथे 1857–58 या काळात इंग्रज व भिल्ल यांच्या अनेक चकमकी झाल्यात. या भिल्लांचे बरेच नुकसान झाले तरी ते डगमगले नाहीत. परिणामी 1857 साली इंग्रजांनी भिल्लांशी बोलणी सुरू करून समेट केला. काजीसिंग या भिल्ल नेत्याला

इंग्रजांनी माफी मागीतली. नांदगांवच्या चकमकीत भिल्लांना प्रचंड विजय मिळाला हे महाराष्ट्रातील उठावाचे मोठे यश होते.

महाराष्ट्रात मराठवाड्यातील औरंगाबाद, नागपूर व मुंबई इत्यादी ठिकाणी प्रचंड उठाव झाले. मुंबईचे शिल्पकार जगन्नाथ शंकरशेठ यांच्यावरसुध्दा संशय घेण्यात आला होता. वास्तविक जगन्नाथ शंकरशेठ व इंग्रज यांचे संबंध चांगले होते. पण जगन्नाथ शंकरशेठ हे प्रथमतः भारतीय होते. त्यामुळेच त्यांच्यावर 1857 च्या उठावात इंग्रजांनी संशय घेतला होता. यावरून ते महान देशभक्त होते हे स्पष्ट होते. नानांचे सरकार दरबारी बरेच वनज होते. त्यांच्यावर खटला दाखल करण्यातइतके धैर्य तत्कालीन इंग्रज सरकारात नव्हते. त्यामुळे या प्रकरणातून नानांची सुखरूप सुटका झाली होती.

जीवनातील अपयश देखील काही काळ गौरवास्पद ठरते. भारतभूमीला स्वतंत्र करण्यासाठी भारतामध्ये व महाराष्ट्रात मराठी लोकांनी जो लढा दिला, त्यागाची तळमळ, स्वधर्म व स्वदेशाविषयीची त्यांची निष्ठा ही निश्चितपणे आजही दाद देण्याजोगी आहे. ज्या साम्राज्यावर सुर्य मावळत नव्हता, त्या बलाढ्य सत्तेशी खेळलेली झुंज ही भारताप्रमाणेच महाराष्ट्राच्या इतिहासातही सुवर्णाक्षरांनी लिहीली पाहिजे. दहशत व कुटील राजनीतीमध्ये मराठे इंग्रज राज्यकर्त्यांसमोर कमकुवत ठरले. हे कटुसत्य असले तरी ज्या प्रेरणा त्या काळात उदयास आल्या त्या प्रेरणा पुढे चिरस्थायी बनत गेल्या. त्या राखेतून आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती झाली. स्वातंत्र्याचे जे भव्यदिव्य स्वप्न त्या काळातील मराठी माणसांनी पाहिले ती स्वप्ने नव्या अर्वाचीन महाराष्ट्राच्या उभारणीसाठी विलक्षण फलदायी ठरली आहे.

➢ संदर्भग्रंथः–

1. बी.एस. ग्रोवर अनुवाद डॉ. एन.के.बेल्हेकर	आधुनिक भारताचा इतिहास	एस चंद आणि कंपनी लि. रामनगर, नवी दिल्ली
2. विपीन चंद्र	आधुनिक भारत का इतिहास	ओरिएंट ब्लैक स्वान, नवी दिल्ली.2012
3. आचार्य श. द. जावडेकर	आधुनिक भारत	कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे–40, 2009
4. अनंत आत्माराम चोडणकर	युगपुरूष, ना. जगन्नाथ तथा नाना शंकरशेठ	आपलं प्रकाशन, गोरेगांव (पू.), मुंबई
5. प्रा. डॉ. प्रकाशचंद्र व्यास	राष्ट्रीय आंदोलनातील महाराष्ट्राचा सहभाग	यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
6. प्रा.डॉ. ह.म. घोडके प्रा. रं.ना.गायधनी	ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र	यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक